महाराष्ट्र विधानपरिषद
दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक १२ जुलै, २०१२
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -

जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री.	**(अ)**	"गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा अलग लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.
	(ब)	"गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांचा सन २००९-२०१० व सन २०१०-२०११ चा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

तीन : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."

चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.

पाच : ठराव -

"बेळगांव महानगरपालिका बरखास्तीला कर्नाटक उच्च न्यायालयाच्या धारवाड खंडपीठाने स्थगिती दिलेली असतानाही व महानगरपालिकेच्या नगरसेवकांचे म्हणणे ऐकण्याचे आदेश दिलेले असतानाही न्यायालयाच्या निर्णयाचा मतितार्थ लक्षात न घेता नगरसेवकांचे म्हणणे मनमानीपणे योग्य ठरवून, कर्नाटक शासनाने बेळगांव महानगरपालिका भाषिक द्वेषातून पुन्हा बरखास्त केली आहे.

कर्नाटक सरकारच्या या अन्यायकारक व नियमबाह्य कृतीबाबत संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असून, राज्यात तीव्र असंतोष पसरलेला आहे.

भाषिक अल्पसंख्यांक असणाऱ्या मराठी जनतेवर अन्यायकारक असलेल्या कर्नाटक सरकारच्या या बेकायदेशीर व घटनाबाह्य कृतीबाबत हे सभागृह तीव्र निषेध व्यक्त करते.

तसेच, बेळगांव महानगरपालिकेची बरखास्ती रद्द करुन, ही महानगरपालिका पुनर्स्थापित करावी, अशा प्रकारचे निदेश केंद्र शासनाने कर्नाटक शासनाला द्यावेत, अशीही शिफारस ही विधानपरिषद केंद्र शासनाला करीत आहे.

महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयात असलेल्या प्रकरणाचा निकाल

लागेपर्यंत हा प्रदेश केंद्रशासीत करावा, अशीही शिफारस ही विधानपरिषद केंद्र शासनाला करीत आहे."

सहा : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -

(१) सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण, चरणसिंग सप्रा, **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबईमध्ये, पश्चिम, मध्य व हार्बर रेल्वे मार्गाच्या दुतर्फा असलेल्या मोकळया जागेत गेल्या अनेक वर्षापासून अनधिकृतरित्या पालेभाज्यांची करण्यात येत असलेली लागवड, या भाजीपाल्यासाठी नाले व गटारातून वाहणारे सांडपाणी सर्रास वापरले जात असणे, या भाज्यांची शहरात मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याने सांडपाण्यातील जीवाणू थेट नागरिकांच्या शरीरामध्ये प्रवेश करतात अनेक लोक कच्च्या पालेभाज्या उदा. मुळा इत्यादीचा वापर आपल्या आहारात सरार्सपणे करत असल्याने त्यांना विविध आजारांचा सामना करावा लागत असणे, शहरातील विविध आजारांचा प्रार्दूभाव होण्यास रेल्वे मार्गालगतच्या भाज्याच कारणीभूत असल्याचा निष्कर्ष अनेक तज्ज्ञ डॉक्टरांनी काढलेला असणे, या गंभीर विषयावर रेल्वे प्रशासनाशी चर्चा करुन यावर कायमस्वरुपी बंदी आणण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारोंच्या संख्येने तीर्थक्षेत्र आळंदीला वर्षातून दोन वेळा भरणाऱ्या यात्रेकरिता तसेच इतर दिवशींही येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याचे पाणी देण्याबाबतच्या मागणीवर गेल्या तीन वर्षापासून निर्णय अंधातरी असणे, यामुळे अजूनपर्यंतही तीर्थक्षेत्र आळंदीला अपुऱ्या आणि दूषित पाण्याच्या समस्येने ग्रासलेले असणे, परिणामी तेथील नागरिकांना अनेक साथींच्या रोगांची लागण होणे. याकरिता पिंपरी पालिकेने आळंदीला तात्पुरत्या स्वरुपाचा पाणी पुरवठा करण्याची मागणी नगरपरिषदेने करुनही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी आळंदीकरांमध्ये शासनाच्या विरोधात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) सर्वश्री. केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"गोंदिया जिल्ह्यातील गोरेगांव तालुक्यात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाकडून १६ गांव व ४ वाडयांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उभारण्यात आलेली

पाणी पुरवठा योजना, मात्र ही योजना तालुक्यातील गोरेगांव व घोटी ही दोन गावे वगळता इतर १४ गावांसाठी कुचकामी ठरली असल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, सदर योजनेतून जलकुंभ तयार करुन पाईपलाईन टाकण्यात आली असून सुध्दा १४ गावांना अद्याप नियमीत पाणीपुरवठा होत नसणे, यासाठी विभागाकडून स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यात आले असले तरी सदर कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची अनुपस्थिती असणे, त्यामुळे सदर योजनेवर जिल्हा प्रशासनाचे असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला असंतोष लक्षात घेता, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाचे निवदने."

(४) **सर्वश्री. सतीश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **क्रिडा व युवक कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"महाराष्ट्र शासनाच्या १९९६ च्या क्रिडा धोरणानुसार मराठवाड्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी क्रिडा संकुल उभारण्याचा असलेला मानस, परंतु प्रत्यक्षात त्यापैकी फक्त ८ च तालुक्यांमध्ये शासनाकडून मंजूरी मिळणे, तालुका क्रिडा संकुलाचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी क्रिडा खात्यामार्फत क्रिडा अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी, पहारेकरी, शिपाई इत्यादींच्या नियुक्त्या नसल्याने क्रिडा संकुलाची देखभाल व्यवस्थित होत नसणे, बहुतेक तालुका क्रिडा संकुलाचे अंदाजपत्रक जुन्या दरसुची नुसार असल्याने ठेकेदार काम करण्यास इच्छुक नसणे, तसेच तालुका क्रिडा संकुल समितीचे अध्यक्ष हे महसूल अधिकारी असल्याने त्यांना त्यांच्या खात्याच्या कामाच्या व्यापातून समितीच्या कामावर म्हणावे तसे लक्ष देता येत नसणे, इमारतीची देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी प्राप्त होत नसणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सात : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -

<u>दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर</u>

(दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत)

आठ : शासकीय विधेयक :-

विचार, खंडश: विचार व संमत करणे-

सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१२.

नऊ : **सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.दिपक सावंत, श्री.चंद्रकांत पाटील, डॉ.निलम गोऱ्हे, श्री.रामनाथ मोते,

श्री.केशवराव मानकर, श्री.पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील, श्री.नागो गाणार **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"दिनांक १७ मे, २०१२ रोजी वा त्या सुमारास परळी, जिल्हा बीड येथील डॉ.सुदाम मुंडे यांच्या रुग्णालयामध्ये गर्भपात करताना श्रीमती पट्टेवार या महिलेचा झालेला मृत्यु, या महिलेच्या मृत्युनंतर रुग्णालयाची तपासणी करण्यासाठी गेलेल्या आरोग्य विभागाच्या पथकाला डॉ.मुंडे यांनी त्यांच्या खोलीत डांबून गुंडांकडून दिलेल्या धमक्या, राज्य शासनाने या प्रकरणाची उच्चस्तरीय पथकामार्फत चौकशी करण्याचे आदेश देऊनही डॉ.सुदाम मुंडे व डॉ.सरस्वती मुंडे या दाम्पत्याने तपासणीस सहकार्य न करता फरारी होणे, भ्रुणहत्या करणाऱ्या डॉ.मुंडे यांची संपत्ती जप्त करण्याचे आदेश दिल्यानंतर डॉ.मुंडे दाम्पत्य पोलीसांना शरण येणे, डॉ.मुंडे यांनी दिलेल्या जबाबावरुन त्यांच्या रुग्णालयात आतापर्यंत सुमारे १ लाखापेक्षा अधिक भ्रुणहत्या करुन हे भ्रुण आपल्या शेतात जाळल्याचे तसेच स्वानांना खाण्यास दिल्याचे उघड होणे, स्त्रीभ्रुण हत्या करुन कोट्यावधी रुपयांची माया कमविणाऱ्या डॉ.मुंडे दाम्पत्याच्या पापावर पांघरुण घालण्यास व त्यांच्या पलायनास परळी पोलीस स्थानकातील अधिकाऱ्यांनी मदत केल्याचे सिध्द झाल्यामुळे गृह विभागाबाबत निर्माण झालेली संशयाची परिस्थिती, डॉ.मुंडे यांच्या रुग्णालयातील या घटनेनंतर बीड येथील डॉ.सानप यांच्या रुग्णालयात अवैधरित्या गर्भलिंग तपासणी करण्यात येत असल्याचे तसेच बीड जिल्ह्यात १२९ सोनोग्राफी केंद्र असल्याचे उघड होणे, अधिकृत गर्भपात केंद्रांनी त्यांचा अहवाल जिल्हा शल्य चिकित्सकांना देणे बंधनकारक असतानाही बीड जिल्हा शल्य चिकित्सकांनी मान्यता दिलेल्या ३३ नव्या गर्भपात केंद्रानी गेल्या ५ वर्षापासून अहवाल पाठविलेला नसणे, या घटनेनंतर राहूरी, जिल्हा अहमदनगर, माळशिरस, जिल्हा सोलापूर, गारखेडा,जिल्हा औरंगाबाद, उल्हासनगर, जिल्हा ठाणे, मानखुर्द, मुंबई व पुणे शहरात स्त्रीभ्रूण हत्या झाल्याचे उघड होणे, राज्यातील सातारा, सांगली, कोल्हापूर, चंद्रपूर हे ४ जिल्हे वगळता एकाही जिल्ह्यात गेल्या ६ वर्षात मुलींचे प्रमाण वाढलेले नसणे, स्त्रीभ्रुण हत्या रोखण्यासाठी गर्भलिंग निदान करणाऱ्या सोनोग्रॉफी सेंटर्सवर राज्य शासनाच्या आरोग्य विभागाला लक्ष व नियंत्रण ठेवता यावे यासाठी राज्यात सर्व सोनोग्राफी यंत्रणेला सायलेंट ऑब्झर्व्हर बसविण्याची योजना शासनाने जाहीर करुनही त्याची अद्यापपर्यंत अंमलबजावणी न होणे, पी.एन.डी.टी. आणि एम.टी.पी. कायद्याची कडक अंमलबजावणी होत नसल्यामुळे स्त्रीभ्रुण हत्येच्या घटनांमध्ये सातत्याने होणारी वाढ, जन्माला येण्यापूर्वीच कोवळ्या कळ्यांना कुस्करुन टाकणाऱ्या डॉ.मुंडे दाम्पत्याविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची तसेच या प्रकारांना आळा घालण्यासाठी महसूल, आरोग्य व गृह विभाग यांनी समन्वयाने काम करुन सोनोग्राफी सेंटर, गर्भपात केंद्रे आदीची नियमित तपासणी करुन

त्यांचे अहवाल प्रसिध्द करण्याची गरज, या प्रकरणातील पोलीसांचा तपास नाटकी व संशयी होत असल्यामुळे हा तपास सीबीआयकडे सोपवावा अशी विनंती अंबाजोगाई सत्र न्यायालयाने आज दिनांक ११ जुलै, २०१२ रोजी मा.उच्च न्यायालयाकडे केल्यामुळे या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्याची आवश्यकता." याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

दहा : **म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

(बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -

सर्वश्री. हेमंत टकले, विक्रम काळे, सुभाष चव्हाण, उल्हास पवार, अनिल भोसले, श्रीमती अलका देसाई, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, रमेश शेंडगे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.चरणसिंग सप्रा **वि.प.स. यांचा प्रस्ताव-**

"राज्यातील बऱ्याच भागात सुरूवातीला पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणीला केलेली सुरूवात, त्यानंतर पावसाने दडी मारल्याने निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांनी १५ लाख हेक्टरवर सुमारे ४५० कोटी रुपयांची बियाणे व खते खरेदी करुन पेरणी करणे, परंतु आता पिके करपल्यामुळे दुबार पेरणीचे ओढवलेले संकट, दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना बँकेमार्फत कर्ज पुरवठा न होणे, परिणामी शेतकऱ्यांना सावकाराकडून जास्त व्याज दराने कर्ज घ्यावे लागणे, शेतीचा वाढलेला खर्च, अपुऱ्या पावसामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेदिवस कमी होणे, राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई, विदर्भात ४३०० गावांना भीषण पाणीटंचाई निर्माण होणे, पिण्याच्या पाण्यासाठी महिलांनी मोर्चे काढून निदर्शने करणे, गुरांच्या चाऱ्याचा व त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, शासनाने ठिकठिकाणी चारा डेपो उघडणे, परंतु तेथे होत असलेला भ्रष्टाचारामुळे व चाऱ्याअभावी शेतकऱ्यांना त्यांची जनावरे कमी दराने विकावी लागणे, गावांत रोजगार मिळत नसल्यामुळे राज्यातील शेतकरी विशेषतः विदर्भातील शेतकरी मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथे कुटुंबियांसह स्थलांतरित होणे, दुष्काळाचा सामना करण्यासाठी राज्यात शेततळी निर्माण करण्याची तसेच अवर्षणप्रवण भागात जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची नितांत आवश्यकता, राज्यात दुष्काळी महामंडळाची स्थापना होऊन अद्यापी त्या मंडळाला निधी देण्यात आला नसल्याने मंडळाचे काम ठप्प होणे, केंद्र शासनाची असलेली आर.आर.आर.योजना राज्यात राबविण्याबाबत शासनाकडून होत असलेला विलंब, त्यामुळे १९७२ सालच्या पाझर तलावाच्या दुरूस्तीचा निधी उपलब्ध न होणे, प्रलंबित असलेला निधी व त्यानंतरच्या कोल्हापूर टाईप बंधारे व पाझर तलावांच्या दुरूस्तीचा निधी मिळण्याची आवश्यकता, दुष्काळ

जाहिर करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य बाजारपेठ व भाव मिळणेबाबत तसेच विविध वित्तीय संस्था व बँकाकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

अकरा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)

(१) श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"नाशिक शहरातील जुन्या नाशिक भागातील घरे प्रामुख्याने भेंडे, दगडमातीची आणि मातीच्या ढिगाऱ्यांवर वसलेली असणे, या परिसरातील रस्ते अतिशय अरुंद असल्याने मुलभूत सुविधा, स्वच्छता व वाहतुकीचा प्रश्न निर्माण झालेला प्रश्न, गावठाण भागातील या सुविधा राबविण्याकरिता शासनाने महापालिकेकडून व्यापक विकास प्रस्ताव दर्शविणारी योजना तयार करुन शासनास सादर करण्याचे निर्देश देऊनही महापालिकेकडून कार्यवाही करण्यास विलंब होणे, मुंबईच्या धर्तीवर जुने नाशिक भागात गावठाण पुनर्विकास योजना तात्काळ राबविण्याची आवश्यकता."

(२) श्री.रामनाथ मोते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात शैक्षणिक वर्ष २०००-०१ पासून शिक्षण सेवक योजना लागू असून नियुक्तीनंतर ३ वर्षे मानधन व ३ वर्षे समाधानकारक सेवेनंतर नियमित वेतनश्रेणी देण्याची तरतूद असणे, आरक्षणाची पदे भरण्यासाठी अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्याची सवलत लागू असणे, अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षकांना ३ वर्षात डी.एड. प्रशिक्षणाची सोय शासनाकडून उपलब्ध न होणे, ३ वर्षात डी.एड. न झालेल्या शिक्षकांना मानधनावरच वेतन देणे, ३ वर्षापेक्षा अधिक काळ मानधनावर ठेवणे, अन्यायकारक असून मागासवर्गीयांचे शोषण करणारे असणे, ३ वर्षानंतर अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना अप्रशिक्षित शिक्षकांना वेतनश्रेणी अनुज्ञेय असणे, अप्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीची तरतूद नियमात असणे, डी.एड. प्रशिक्षित व शिक्षण सेवक कालावधीचा संबंध नसल्याने ३ वर्षानंतर वेतनश्रेणी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ११ जुलै, २०१२.

डॉ.अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.